**महाराष्ट्र शासन**
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)
तालुका-आंबेगाव, जिल्हा-पुणे ४१२४०५
दूरध्वनी क्र ०२१३३ २३०५८२ संकेतस्थळ: www.gcoeara.ac.in
ईमेल: office.gcoeavasari@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शाअवसंमअ/मध्य सत्र परीक्षा/२०२४/११२९ दिनांक ०५/०४/२०२४

**परिपत्रक:-**

**विषय:-** 2015 Pattern च्या (Even Sem, Backlog Subjects) विद्यार्थ्यांसाठी मध्य सत्र परीक्षा आयोजित करण्याबाबत.

**संदर्भ:-** SPPU विद्यापीठाचे पत्र क्र. Ref. No. S&T/527 Date: 02/04/2024.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख व विषय शिक्षकांना कळविण्यात येते कि, **2015 Pattern** मधील ज्या विद्यार्थ्यांचे Even-Sem मधील Backlog विषय आहेत व अशा विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी 2015 Pattern Even-Sem मधील विषयांची परीक्षा देवू इच्छितात अशा विद्यार्थ्यांसाठी विषय शिक्षकांनी आपापल्या विषयांची मध्य सत्र परीक्षा (2015 Pattern Even-Sem Backlog) खालील पद्धतीने विभागीय स्तरावर घ्यावी.

१) सदर परीक्षेबाबत महाविद्यालय website वर विद्यार्थ्यांसाठी नोटीस जारी करण्यात आली आहे.

२) सदर नोटीस च्या संदर्भाने, संबंधित विद्यार्थ्यांनी विभागाकडे किंवा विषय शिक्षकाकडे संपर्क साधला असता, त्या विषय शिक्षकाने आपल्या विषयाच्या SPPU नियमाप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे ३ संच काढावेत व सदर प्रश्नपत्रिकेचे ३ संच व सदर विषयासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी सीलबंद पाकिटामध्ये परीक्षा विभागामध्ये वरिष्ठ पर्यवेक्षकांकडे **दि.१८/०४/२०२४** पर्यंत जमा करावीत.

३) **दि.१९/०४/२०२४** रोजी नोंदणी होणाऱ्या सर्व विषयांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल व सदर वेळापत्रक **दि.२०/०४/२०२४ ते दि.२५/०४/२०२४** या दरम्यान असेल.

४) सदर जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संबंधीत विषय शिक्षकाने आपल्या विषयाच्या परीक्षेच्या दिवशी अर्धा तास अगोदर सदर विषयाची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका ताब्यात घेऊन सदर विद्यार्थ्यांची परीक्षा आपल्या विभागामध्ये वेळापत्रकातील वेळेप्रमाणे घावी.

५) परीक्षा पार पडल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासून सदर विद्यार्थ्यांची Attendance Sheet व Result Sheet ची एक झेरॉक्स प्रत तसेच तपासलेल्या उत्तरपत्रिका विषयानुसार परीक्षा विभागात जमा कराव्यात.

६) सर्व विभागांनी वरीलप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व एकाही विद्यार्थ्याने सदर परीक्षेसाठी नोंदणी न केल्यास निरंक असा अहवाल निम्न स्वाक्षरीकार/ महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांना **दि ३० एप्रिल २०२४** पर्यंत पाठवावा.

05-4-24
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी(खुर्द)

प्रत,

१) सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
२) महाविद्यालय परीक्षा अधिकारी यांना माहितीसाठी
३) DPU यांनी सर्व विभागप्रमुखांना E-MAIL द्वारे